# नियतकालिक चळवळीत साप्ताहिक 'साधना'चे योगदान

**सौ. शीतल सचिन गोर्डे-पाटील***

साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

**Accepted**: 06.09.2022 **Published**: 01.10.2022

**Keywords**: नियतकालिक चळवळ, साप्ताहिक 'साधना'

**सारांश:**

*कोणत्याही राजकीय पक्षाचे, संघटनाचे अथवा चळवळीचे साप्ताहिक 'साधना' अधिकृत मुखपत्र नसल्याने खुल्या विचाराची ध्येयवादी पत्रकारीता हे सामाजिक मूल्यभान साप्ताहिक 'साधना' गेली ६८ वर्षे जपले आहे. साप्ताहिक 'साधना'च्या स्थापनेच्यावेळी साने गुरुजींनी घेतलेला ध्येयवादाचा वसा अविरतपणे जपला जात आहे.*

**Paper Identification**

*Corresponding Author

**प्रस्तावना-**

'प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत', असे माध्यमांचे वर्णन नेहमीच केले जाते. समाजात सतत घडत असणाऱ्या चांगल्या-वाईट घटनांचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमांत उमटत असते. समाजमनावर प्रसारमाध्यमांचा प्रभाव पडलेला आपणांस नेहमी दिसतो. समाजात घडणाऱ्या घटना, सुरु असलेल्या सामाजीक, राजकीय, सांस्कृतिक चळवळीचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमांच्या आरशात नेहमी पडते. यामुळे प्रसारमाध्यमातुन निर्माण होणारे वाङ्मय, मानवी विकास, मानवी मुल्यांची जोपासना अशा ध्येयवादी दिशेने जाते. माध्यमांत साप्ताहिकांचे योगदान खूप मोठे आहे.

अर्वाचीन साहित्यामध्ये नियतकालिके, साप्ताहिके, निबंधवाङ्मय ह्यांनी भर घातली आहे. आधुनिक महाराष्ट्रात विविध क्षेत्रात जागृती करण्याचे काम वृत्तपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके यांच्या माध्यमातून होत असल्याचे आपल्याला दिसते.

मराठी निबंधाच्या विकासात नियतकालिकांचा फार मोठा वाटा आहे. बाळशास्त्री जांभेकर यांनी १८३२ साली 'दर्पण' हे वृत्तपत्र आणि त्यानंतर १८३८ ला मराठीतील पहिले नियतकालिक 'दिग्दर्शन' सुरु केले. यानंतर मराठी नियतकालिकांची लाटच आली. या नियतकालिकांच्या वाचनातून वाचक घडत होता. 'समाजप्रबोधनपत्रिका', 'सत्यकथा', 'मौज', 'प्रतिभा', 'अभिरुची', 'साधना', 'प्रतिष्ठान', 'अनुष्टुभ' ही नियतकालिके विविध प्रयोजनांसाठी चालविली जात होती. अशातच ध्येयवादी पत्रकारितेचे महाराष्ट्रातील एक अभिजात उदाहरण म्हणजे 'साधना' हे साप्ताहिक होय. विषमता आणि वैरभाव मिटवण्याची विचाराची झुंज देण्याच्या भावनेतून साने गुरुजींनी 'साधना' हे साप्ताहिक सुरु केले. भूदान चळवळीपासून ते नर्मदा आंदोलनापर्यंत गेल्या दशकांमधील सर्व परिवर्तनवादी चळवळींना 'साधना'ने

उचलून धरले. त्याच बरोबर मध्यमवर्गीय संवेदनशील वाचकांचा वैचारिक पाया घडवण्याचे कामही 'साधना'ने केले. गेल्या ६८ वर्षातील राजकीय-सामाजिक चळवळीत 'साधना' अग्रभागी राहिली. आणीबाणीच्या वेळी 'साधना'ने दिलेला विचार स्वातंत्र्याचा लढा तर अविस्मरणीय आहे. 'साधना'चे संचालक व संवर्धक समाजवादी पक्ष संघटनेत काम करणारे व चळवळीतील कार्यकर्ते होते. पण तरीही 'साधना' हे समाजवादी पक्षाचे मुखपत्र झाले नाही. 'साधना'ची ओळख 'विचारपत्र' अशीच राहिली आहे.

**साने गुरुजींची 'साधना'** -

साने गुरुजी यांच्यावर गांधीजींचा व रवींद्रनाथ टागोरांचा खूप मोठा प्रभाव होता खादीचा वापर करीत. १९३० मध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी सोडून कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. त्यांनी त्याकाळी 'सायंदैनिक' नावाचे साप्ताहिक सुरु केले होते. दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी व्हावी म्हणून प्रयत्न केला. १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून स्वतंत्र्याचा प्रचार, राष्ट्रसेवा दलाचे कार्य या माध्यामांतून त्यांनी राजकीय कार्य केले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी 'साधना' हे साप्ताहिक सुरु केले. हे साप्ताहिक साने गुरुजींच्या जीवनाचे थेट ध्येय होते. महात्मा गांधी यांची हत्या झाल्यानंतर गुरुजींनी 'कर्तव्य' नावाचे सायंदैनिक काढले. लवकरच ते बंद पडले. ते बंद पडल्यानंतर गुरुजींनी आपल्या १०० मित्रांना गोळा करून, त्यांना पत्र लिहून त्यांच्याकडून पैसे जमवले आणि दहा हजार रुपयांचे एक प्रिंटिंग मशीन घेतले. त्यावेळी एका टपरीच्या जागेत त्यांनी 'साधना' साप्ताहिकाची सुरुवात केली. रवींद्रनाथ टागोरांच्या एका काव्यसंग्रहाचे नाव 'साधना' यावरून त्यांनी आपल्या साप्ताहिकाला 'साधना' हे नाव दिले असावे असे म्हणावयास हरकत नाही. त्यावेळी त्यांनी एक मनोवेधक लेखन केले होते. 'कर्तव्य' हे सायंदैनिक बंद पडले, आता 'साधना' हे साप्ताहिक बंद पडले तर ह माणूस आरंभशूर होता असे म्हणू नका, तर त्याच्या जीवाला राहवत नाही म्हणून तो धडपड करत असतो, असे म्हणा असे आवाहन त्यांनी वाचकांना केले होते. त्यांच्या जीवनदृष्टीवर प्रकाशझोत टाकणारे हे वक्तव्य आहे. ही जीवनदृष्टी विचारात घेणे गरजेचे आहे.

**'साधना'ची गरज** - -

१५ ऑगस्ट १९४८ ला साधना चा पहिला अंक निघाला. 'साधना' कशाकरता आहे, याबद्दल साने गुरुजींची दृष्टी अगदी स्वच्छ होती. पहिल्या अंकातच या संदर्भात लिहिताना ते म्हणतात, 'वैरभाव नि विषमता नष्ट करण्याची थोर 'साधना' आपणास करावयाची आहे. हे 'साधना' साप्ताहिक या ध्येयाने जन्मत आहे.... या साप्ताहिकाचे स्वरूप कसे असेल? निरनिराळ्या भाषांतील मौल्यवान प्रकार तुम्हाला दिसतील. शेतकरी - कामगार यांच्या जगतातही आपण येथे वावरू, त्यांचे प्रश्न चर्च. त्यांची स्थिती समीक्षू... मुलांच्या संगतीत रमू. समाजात अनेक अज्ञात मानसे सेवा करून समाजवृक्षाला ओलावा देत असतात. त्यांच्या हकीकती येथे येत जातील. कधी येथे प्रश्नोत्तररूप महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा आढळेल... कधी आपण साहित्याच्या मंदिरात दर्शनाला जाऊ; कधी विज्ञानाच्या पराक्रमी कथा एकू... कधी निर्मळ समाजाचे उपनिषद वाचू...' याचा अर्थ असा की 'साधना'ला ध्येयवाद होता; राजकीय तत्वज्ञान होते; परंतु एकारलेपणा नव्हता. जीवनाच्या सर्व अंगांचे 'साधना'ला अगत्य होते आणि आजही आहे. या समग्रतेचा बारकाईने विचार केला, तर एक विलक्षण गोष्ट आढळते. 'साधना' साप्ताहिक निघाल्यानंतर सुमारे दीड वर्षांने भारतीय संविधान निर्माण झाले. भारत खंडातील जनसामान्यांच्या जीवनाच्या आशा-आकांक्षा साकार करण्याची संविधानिक तयारी झाली; परंतु संविधानाने ज्या ज्या तत्वांचा, मूल्यांचा उद्घोष केला, ती सारी बीज रूपाने 'साधना कशासाठी?' या गुरुजींच्या निवेदनात आणि त्याप्रमाणे 'साधना'ने केलेल्या दीड वर्षाच्या वाटचालीतही दिसतात.

**मराठीतील ध्येयवादी पत्रकारिता**

१५ ऑगस्ट २०१६ रोजी 'साधना' ने आपले ६८ वर्ष पूर्ण केले आहे. मराठी ध्येयवादी पत्रकारितेत आशी उदाहरणे कमीच आढळतील. मराठीतील अनेक साप्ताहिके ध्येयवादाच्या आणि विशिष्ट जीवनदृष्टीच्या आग्रहाने प्रामाणिकपणे उभी होती. मात्र गेल्या दोन-तीन दशकांत ती अस्तंगत झाली आहेत. याची बहुविध मीमांसा करता येईल. परंतु साप्ताहिक 'साधना'चा वेगळा संदर्भ लक्षात आणून देण्यापुरती एक बाब मांडता येते ती अशी, की ही सर्व ध्येयवादी साप्ताहिके किंवा मासिके ही व्यक्तिगत मालकीची होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करायला त्यामुळे सामर्थ्याच्या मर्यादा पडल्या. 'साधना' साप्ताहिक हे विश्वस्त मंडळातर्फे चालवले जात आहे. वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळे विश्वस्त झाले आणि त्यांनी त्या त्या वेळच्या कठिणाईचा सामना करत 'साधना'च्या ध्येयवादाबरोबर 'साधना'च्या भौतिक गरजांचा तोल सांभाळला.

**'साधना'तील संपादक** -

'साधना'ला अगदी सुरुवातीपासून लाभलेले संपादक हे असेच एक विलक्षण बलस्थान आहे. भारतीय पत्रकारितेतही या दर्जाची अखंड परंपरा कोणाही साप्ताहिकाला लाभलेली नाही. साने गुरुजींच्या सारखे उत्कट ध्येयवादी स्वातंत्र्यसैनिक व अक्षर साहित्य देणारे लेखक हे 'साधना'चे संस्थापक. स्वातंत्र्यचळवळीचे भारतीय पातळीवरील नेते रावसाहेब पटवर्धन व गांधीवादाचे प्रज्ञाशील भाष्यकार आचार्य जावडेकर हे 'साधना'चे काही काळ संपादक होते. आंतरभारतीचा मंत्र हृद्यात सतत बाळगून तो कृतीप्रवण करण्यासाठी धडपडणारे यदुनाथाजी थत्ते यांनी दीर्घकाळ 'साधना'चे संपादकपद भूषविले. थोर समाजवादी विचारवंत व तेवढ्याच तोलामोलाचे शैलीदार लेखक नानासाहेब गोरे व एस. एम. जोशी काही काळ 'साधना'चे संपादक होते. आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ कवी प्रा. वसंत बापट आणि मूल्यांचे राजकारण निर्लेपपणे कसे करावे याचे जितेजागते उदाहरण असलेले राजकीय नेते व त्याचबरोबर साहित्यिक असलेले प्रा.ग प्र. प्रधान यांनीही काही काळ 'साधना'ची धुरा वाहिली. साधनाच्या संपादक मंडळात काही काळ दुर्गा भागवत, मंगेश पाडगावकर या दिग्गजांचा समावेश होतो. ना. य. डोळे, सदानंद वर्दे, प्रा. रा. ग. जाधव. डॉ. नरेंद्र दाभोळकर, विनोद शिरसाठ यांचीही नावे घ्यायला हवी. समृद्ध संपादकीय परंपरा साप्ताहिक 'साधना'ला कायम लाभली आहे.

**'साधना'तील लेखक** - -

गेल्या साठ वर्षाच्या कालखंडातील सर्व प्रतिथयश कवी, साहित्यिक, विचारवंत, यांनी 'साधना'त लिहिले आहे. 'साधना'ला समृद्ध करणे, ही स्वतःची बांधिलकी मानून हे लिखाण झाले आहे. दुर्गा भागवत, अनिल अवचट, ह. मो. मराठे, राजन गवस, रजिया पटेल, अरुण साधू, कुमार केतकर, हेरंब कुलकर्णी, संतोष पवार यासारख्या मराठी साहित्यात स्वतःचा ठसा उमटविणाऱ्यांचे पहिलेवहिले लेखन 'साधना'त प्रकाशित झाले आहे. लेखक आणि वाचक यांची एक अनोखी मांदियाळी 'साधना'ने घडविली. ते एकमेकांना पूरकही होते आणि एकमेकांना घडवतही होते. विशेष आनंदाची बाब म्हणजे ६८ वर्षांपूर्वी चालू असलेली परंपरा आजही चालू आहे. साधनाचे तारुण्य आणि टिकून राहण्याचे हे एक महत्वाचे कारण आहे.

**'साधना' साप्ताहिकातील विशेषांक** -

'साधना' सारखी साप्ताहिके विशिष्ट प्रयोजन घेऊन जन्माला येतात आणि निष्ठापूर्वक तशीच जगतात. या वाटचालीत नकळत एकारलेपणा येतो. त्यामुळे दीपावली व तिच्या निमित्ताने निघणारे अंक यांसारख्या प्रसंगांचे चैतन्य पकडणे अवघड ठरण्याची शक्यता असते. मराठी भाषेत दीपावली अंकांना विशेष स्थान आहे. भारतातील अन्य कोणत्याही भाषेत दीपावली अंकांची मराठीसारखी मोठी परंपरा नाही. या परंपरेतही साधनाने आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. ही बाब आनंदाची आणि अभिमानाची आहे. गेल्या दशकाचा आढावा घेतला, तर 'साधना'च्या दीपावली अंकाला

प्रतिवर्षी कोणकोणता पुरस्कार मिळत गेल्याचे दिसून येईल. सर्वोत्कृष्ट अंक, त्याचबरोबर सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ, सर्वोत्कृष्ट कथा असे पुरस्कारही 'साधना'ला मिळत असतात. संस्थापक साने गुरुजींच्या भावविश्वात लहान मुलांना एक विशेष स्थान होते. "करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे त्यांचे वचन प्रसिद्धच आहे. त्याला स्मरून बालविभागाचे अनेक उपक्रम 'साधना'ने केले आहेत. लहान मुलांवर अंक काढणे इथ पासून ते बालकांनी निर्माण केलेल्या लेखन आणि चित्रांनीच अंक सजवणे इथपर्यंत अनेक प्रयोग 'साधना'ने यशस्वीपणे केले आहेत. सध्याही 'साधना'त 'बालसाधना' हे सदर प्रसिद्ध होते आणि ते लहान थोर या दोघांमध्येही वाचकप्रिय आहे.

**'साधना'चे सामाजिक मूल्यभान** -

'साधना'चे सामाजिक मूल्यभान काय आहे, हे साने गुरुजींनी आपल्या पहिल्या संपादकीयात लिहून ठेवलेच आहे. 'वैरभाव नष्ट करण्याची थोर 'साधना' आपणास करावयाची आहे'. असे ते म्हणतात. हीच बाब 'साधना'चे एक संपादक कविवर्य वसंत बापट यांनी रचनाबद्ध केली आहे. साधनाच्या शिरोभागी नियमितपणे प्रसिद्ध होणारा तो भावसंदेश आहे

"स्थापिण्या समता शांती ठेउनी शुद्ध साधना !
करीती साधना त्यांना ठेऊ उस्फुर्त साधना !!"

'साधना'चा ६८ वर्षांचा इतिहास पहिला, तर या ब्रीदाला ती पुरेपुर उतरली असे म्हणता येते. परिवर्तनासाठी विधायकता आणि संघर्ष यांचा 'साधना'ने सातत्याने पाठपुरावा केला आहेच; पण केवळ एवढेच नाही तर, याबाबतच्या विचार-आचाराची व मूल्याची गुढी बुलंद उभारण्याचे काम हे जणू 'साधना'ने आपले जीवित कार्यच मानले आहे. समाज बदलाची विधायक स्पंदने 'साधना'ने सातत्याने सर्वदूर पोहोचवली.

'चळवळीचा वैचारिक पाठपुरावा केला. १) विनोबा भावे यांनी चालू केलेल्या भूदान चळवळीचा वैचारिक

२) बाबा आमटे यांचे कार्य आज विश्वविख्यात झाले आहे; परंतु आनंदवन आणि हेमलकसा येथील 'ज्वाला आणि फुले' 'साधना'नेच सर्वप्रथम महाराष्ट्रात पोहोचवले.

३) मुस्लीम समाजात प्रबोधनकरणारे हमीद दलवाई यांचा विचार सतत लावून धरला.

४) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा पाठपुरावा केला.

५) डॉ. 'एक गाव एक पाणवठा' ही सामाजिक समतेसाठी कृतीशील संवादाची चळवळ बाबा आढाव यांनी चालू केली. त्याला 'साधना'ने खंबीरपणे पाठिंबा दिला.

६) भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनात 'साधना'चे संपादक ग. प्र. प्रधान स्वतः सामील झाले होते. त्यामुळे त्याचे पडसाद स्वाभाविकपणेच 'साधना'तून उमटले.

७) जंगल, जमीन आणि पाणी यांवर सर्वसामान्य कष्टकऱ्यांचा अधिकार असावा आणि कोणत्याही प्रकल्पापूर्वी त्यामुळे होणाऱ्या विस्थापितांचे विकसनशील पुनर्वसन
प्रथम व्हावयास हवे, त्यासाठीचा नर्मदा बचाव आंदोलनाचा लढा 'साधना'च्या मुखपृष्ठासह अंतरंगाचा अनेकदा विषय ठरला आहे.

८) एन्रॉन वीजकंपनी बरोबर शासनाने केलेला करार, हा जणू महाराष्ट्र विकण्याचाच होता. त्या विरोधातही सततचा संघर्ष 'साधना'ने लावून धरला.

९) व्यसनमुक्ती चळवळीला 'साधना'ने नेहमीच पाठिंबा दिला.

१०) अंधश्रध्दा निर्मूलनाचे लढे हेही 'साधना'ने आपल्या बांधिलकीचे विषय मानले. इतक्या सातत्याने, इतक्या दीर्घकाळ सामाज परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या पत्रकारितेचे उदाहरण राज्याच्या पत्रकारितेत दुर्मिळ आहे.

११) 'साधना'ने आणीबाणीतील अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याच्या दडपशाही विरोधी दिलेला लढा हा तर वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या इतिहासातील एक तेजस्वी अध्याय मनाला जातो. सेन्सोरशीप मान्य करून 'साधना' निमुटपणे चालवायची का? प्रसंगी सर्व प्रकारच्या परिणामांची तयारी ठेऊन 'साधना'च्या सत्त्वाला जागायचे, याचे 'साधना'ने दिलेले उत्तर दुसऱ्या बाजूचे होते

१२) गुजरातमध्ये गोध्रा घटनेचा प्रतिवाद म्हणून एक भीषण नरसंहार, द्वेषाची तीव्रता इतकी होती की, मुल्यांचा जप करणारी मंडळी मूग गिळून गप्प होती. भूकंपात गुजरातच्या मदतीला मराठी वृत्तपत्रसृष्टी धावली. ती तर निसर्गनिर्मित आपत्ती होती; पण त्या अस्मानी आपत्तीत मधून जाणारी मराठी वृत्तपत्रसृष्टी सुलतानी आपत्तीत मात्र एकदम स्तब्ध झाली. मराठी वृत्तपत्रसृष्टीत गुजरातच्या दंगलग्रस्त बांधवांसाठी निधी उभारण्याचे आणि हिंदू-मुस्लीम बांधवाना ती वाटण्याचे नैतिक कर्तव्य 'साधना'ने पार पाडले आहे.

१३) बांगलादेश मुक्तीसंग्राम, जयप्रकाशजींच्या उपचारासाठी निधी उभारणी, महाराष्ट्रातील महापूर वा दक्षिणेतील त्सुनामी लाट या सर्व प्रसंगी 'साधना'ने आपला थेट मदतीचा हात आपल्या वाचकांच्या सहकार्याने आपग्रस्तापर्यंत पोहचवला आहे.

१४) राजकारण, लोकशाहीमूल्य, सत्यनिष्ठा, धर्मनिरपेक्षतावाद, मानवी जगण्यातील आर्थिक पेच, शेती समोरील आव्हाने, शैक्षणिक क्षेत्रात होत असलेले बदल यावर 'साधना'त सातत्याने लिखाण होत असते.

१५) ' वाचनसंस्कृती अभियान' अंकाचा एक आगळावेगळा उपक्रम गेली दोन-अडीच वर्षे चालू आहे. प्रत्येक महिन्यातील पहिला अंक हा संपूर्णपणे साहित्याला वाहिलेला
असतो आणि मराठी सारस्वतात हा अंक झपाट्याने लोकप्रिय झाला आहे. साप्ताहिक 'साधना' आता संकेत स्थळावरही (वेबसाईटवर आले आहे.

**निष्कर्ष** -

१) राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, समाजवाद, जातिधर्मातीत मनोवृत्ती आणि विज्ञानाभिमुखता ही पाच मूल्य रुजवण्याची साप्ताहिक 'साधना' धडपड आजही सुरु आहे.

२) साप्ताहिक 'साधना'ने आपला ध्येयवादाचा वसा जोपासला आहे.

३) साप्ताहिक 'साधना' सामाजिक प्रबोधन व परिवर्तनाचे साधन ठरले आहे.

४) साप्ताहिक 'साधना'ने नेहमीच सामाजिक मूल्यभान जपले आहे.

संदर्भ -

१) परांजपे भा. श्री, अर्वाचिन वाङ्मयाचा इतिहास, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९९७.

२) प्रधान ग. प्र जाधव रा.ग, संपा- 'निवडक साधना खंड १ ते ८, साधना प्रकाशन, पुणे २००७.

३) साप्ताहिक साधना अंक, साधना प्रकाशन.

४) www.weeklysadhana.com